महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
Web:www.dhepune.gov.in
E-mail : bed.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९.२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१११९५३

क्रमांक उशिसं/२०१६/नाहप्र/प्र.क्र.३३२(१)/बीएड दिनांक १२.०७.२०१६

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय अध्यापक महाविद्यालये,

**विषय : शासकीय शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमास शासनाचे सुधारीत ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**संदर्भ :** शासन पत्र क्रमांक बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(१)/मशि-२, दिनांक ११.०७.२०१६

उपरोक्त संदर्भीय शासन पत्रान्वये शासनाने शासकीय शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमास सुधारीत ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. सुलभ संदर्भासाठी शासन पत्राची प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

( डॉ.धनराज माने )
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १

प्रत :

१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य, यांना माहिती तथा शासन पत्रात नमुद केल्यानुसार कार्यवाही करीता अग्रेषित.

२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

३. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(१)/मशि-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ जुलै, २०१६.

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

**विषय:- शासकीय शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**संदर्भ** :- (१) शासन परिपत्रक क्र.बीएड-४६१५/प्र.क्र.१६२/१५/मशि-२,दि.२१ ऑगस्ट,२०१५ व शासन पुरकपत्रक, समक्रमांक, दि. ०३.१०.२०१५,
(२) शासन पत्र क्रमांक बीएड.४६१५/प्र.क्र.३३२/मशि-२, दि.१५.०३.२०१६,
(३) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/२०१५/ प्र.क्र.१६२/१५/बीएड./६०६०, दिनांक ११.०५.२०१६.

National Council for Teachers Education (Recognition, Norms and Procedure) Regulation, 2014 अन्वये राज्यातील अध्यापक महाविद्यालयांना एनसीटीईकडून सुधारीत मान्यतेचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. (१) येथील दिनांक २१.८.२०१५ च्या परिपत्रकान्वये व दि.०३.१०.२०१५ च्या पुरकपत्रकान्वये राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, पश्चिम क्षेत्रिय समिती, भोपाळ यांच्याकडून सुधारीत मान्यताप्राप्त अध्यापक महाविद्यालयांना शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्र.२ येथील शासन पत्रान्वये सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या स्तरावर स्थापन केलेल्या पथकाने दिलेल्या शिफारशीनुसार संचालक, उच्च शिक्षण यांनी संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये राज्यातील शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांना शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास अनुसरुन सोबत जोडलेल्या परिशिष्टामधील शासकीय शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांना (बी.एड.) नमूद विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या युनिटना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून खालील अटींच्या अधीन राहून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१) एन.सी.टी.ई.,भोपाळ यांच्या मान्यतेच्या पत्राची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.
२) एन.सी.टी.ई.,भोपाळ यांच्या नियमाप्रमाणे अभ्यासक्रमाचे विहीत दिवस पूर्ण होतील याची खात्री करुन विद्यापीठाने संलग्नता प्रदान करावी.
३) एन.सी.टी.ई.,भोपाळ यांनी विहित केलेल्या अटींची पुर्तता करण्यात आल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

४) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी केलेल्या सर्व शिफारशी शासनाच्या संदर्भाधिन क्र. १ येथील दि. २१/०८/२०१५ रोजीच्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे National Council for Teachers Education (Recognition, Norms and Procedure) Regulation, 2014 च्या सुधारीत निकषांची काटेकोर तपासणी करुन केलेल्या आहेत, या धारणेच्या अधीन राहून सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. भविष्यात या संदर्भात उद्भवणारी न्यायालयीन प्रकरणे अथवा अन्य आक्षेपांची संपूर्ण जबाबदारी संबंधित सहसंचालकांची राहील.

( रोहिणी भालेकर )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
सर्व संबंधित शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत)
निवडनस्ती (मशि-२)

## शासन पत्र क्रमांक : बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(१)/मशि-२,
## दि.११ जुलै, २०१६ चे
## परिशिष्ट
### शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालये (बी.एड.)

| अ.क्र. | विभाग | महाविद्यालयांचे नांव | शासकीय तत्वावर शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त युनिट |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | पनवेल विभाग | शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल, जि.रायगड | ५० विद्यार्थ्यांचे एक युनिट शासकीय तत्वावर चालविण्यास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| | | शासकीय अध्यापक महाविद्यालय, रत्नागिरी | |
| २ | नागपूर विभाग | शासकीय शिक्षण महाविद्यालय, कोठारी मेटल समोर, स्टेशन रोड, भंडारा | |
| ३ | कोल्हापूर विभाग | श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर | |
| ४ | औरंगाबाद विभाग | शासकीय अध्यापक महाविद्यालय, औरंगाबाद. | |
| | | शासकीय अध्यापक महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड. | |
| ५ | अमरावती विभाग | शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ | |
| | | शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला | |
| | | शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा | |
| ६ | नांदेड विभाग | शासकीय अध्यापक महाविद्यालय, परभणी | |
| | | शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड | |
| ७ | मुंबई विभाग | शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई | |

-------